क्र.साप्रवि/रवका/न.क्र.५८/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ३३८दि. ०२/०५/ २०११

विषय : जनसंपर्कात येणाऱ्या कर्मचाऱ्यांनी/अधिकाऱ्यांनी कार्यालयीन कामाच्या वेळेत गणवेष व नामपट्टीचा वापर करणेबाबत.

.....

महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने विद्युत अधिनियम २००३ व विद्युत अधिनियम २००५ अनुसार जनसंपर्कात येणाऱ्या प्रत्येक कर्मचाऱ्याने स्वतःच्या नावाच्या नामपट्टीचा वापर करणे अत्यंत आवश्यक आहे अशा स्पष्ट सूचना दिल्या आहेत. त्याचप्रमाणे अशा सर्व कर्मचारी व अधिकाऱ्यांनी कार्यालयीन वेळेत त्यांचेकरिता घोषित गणवेषाचा वापर करणेबाबत वारंवार निर्देश देण्यात आले आहेत.

२. तथापि, असे निदर्शनास आले आहे की, क्षेत्रिय कार्यालयामधील जनसंपर्कात येणारे कर्मचारी/अधिकारी त्यांचेकरिता विहित केलेला गणवेष आणि नामपट्टीचा वापर करण्यास हेतुपुरस्परपणे टाळाटाळ करतात. सदर बाब व्यवस्थापकीय संचालक यांनी अतिशय गंभीरपणे घेतली आहे. सर्व कर्मचारी व अधिकारी यांना असे निर्देशित करण्यात येते की, त्यांनी त्यांचेकरिता विहित केलेला गणवेष आणि नामपट्टीचा वापर कटाक्षाने करावा.

३. क्षेत्रिय कार्यालयातील सर्व कार्यकारी संचालक व मुख्य अभियंत्यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या अधिपत्याखालील जनसंपर्कात येणारे कर्मचारी/अधिकारी कामावर असताना विहित गणवेष आणि नामपट्टीचा वापर करतात याची शहानिशा करावी आणि गणवेष आणि नामपट्टीचा वापर न करणाऱ्या कर्मचारी/अधिकारी यांचेविरुध्द नियमानुसार दंडात्मक कार्यवाही करावी. दंडात्मक कार्यवाही केल्यानंतरसुध्दा कामावर असताना विहित गणवेष आणि नामपट्टीचा वापर न करणाऱ्या कर्मचारी/अधिकारी यांचेविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही सुरू करावी.

४. सदर परिपत्रक कंपनीच्या इंट्रानेटवर उपलब्ध करण्यात आले आहे.

*(विजय भि. बागुल)*
*मुख्य महाव्यवस्थापक (क)*

प्रति,
महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे.

*D:\O&M\Adm.Cir.F.N.10 & 58-Uniform,Name Budget.doc*
*30/4/2011*